**नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई यांच्या कार्यालयांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - वैमाशा-२०२५/प्र. क्र.७९/ग्रा.सं.-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २६ ऑक्टोबर, २०२६

संदर्भ:-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६ ब, दि.२१.१२.२०१९
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०२०/प्र.क्र.१८७ ए/१६ ब, दि.३०.०६.२०२०
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०२०/प्र.क्र.१८७ ए/१६ ब, दि.२८.०९.२०२०
४) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्र.वैमाशा-२०१९/प्र.क्र.१६९/ग्रा.सं.-३, दि.११.११.२०२०
५) शासन निर्णय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्र.वैमाशा-२०२०/प्र.क्र.१२१/ग्रा.सं.-३, दि.२९.०१.२०२१
६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ अे/१६-ब, दि.१४.१२.२०२२
७) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी ११२३/प्र.क्र.२९/आरक्षण-२, दि.०४.१०.२०२४
८) वित्त विभागाचे पत्र क्र.पदनि-२०२६/प्र.क्र.६४/आपुक, दि.०३.०९.२०२६ अन्वये प्राप्त उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.१२.०८.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना:-

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ (चेअरमन अँड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुद्ध जगदिश बलराम बहिरा व इतर) व इतर याचिकांमध्ये दि.०६.०७.२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिलेला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.३१४०/२००८ मध्ये दि.२८.०९.२०१८ च्या आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि.३१.१२.२०१९ पर्यंत कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.७ येथील शासन निर्णयान्वये संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक ११ महिन्याच्या सेवेनंतरचा १ दिवसाचा तांत्रिक खंड सर्व सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्यात आला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाचे सदर आदेश विचारात घेता, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातून मूळ नियुक्ती मिळवलेल्या तथापि सदर प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न शकलेल्या एकूण १९ अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत. सदर १९ अधिकारी/ कर्मचाऱ्यांपैकी अधिसंख्य ठरलेल्या १० अधिकारी/ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून २ शिपाई मृत पावले

आहेत. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशानुसार, नियंत्रक कार्यालय यांनी दि.२७/१/२०२१ अन्वये श्री. रा. सि. चांदगांवकर, शिपाई यांच्या अधिसंख्य पदावरील सेवा वर्ग केल्याचे आदेश रद्द केले आहेत व श्री. ए. के. किरनाके, शिपाई यांनी त्यांचे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असल्याने त्यांच्या सेवा नियमित पदावर वर्ग करण्यात आल्या आहेत. त्यामुळे उर्वरीत ५ अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ व इतर याचिकांमध्ये दि.०६.०७.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये सूचना दिलेल्या आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१ (अ) ते (इ) मध्ये नमूद केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे तसेच अधिसंख्य पदे निर्माण करण्याचे प्राधिकार प्रशासकीय विभागांना दिलेले आहेत. यास्तव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील नियंत्रक, वैध मापन शास्त्र यंत्रणेमधील मूळ अनुसूचित जमातीच्या राखीव संवर्गातून नियुक्त झालेले तथापि, अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या गट-ब मधील २, गट-क मधील २ आणि गट-ड मधील १ अशा एकूण ५ अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी खालीलप्रमाणे ५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत असून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून त्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | गट | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | सेवा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ब | श्री.अ.म. खरात | निरीक्षक | दि.३१.०७.२०२७ |
| २ | ब | श्री.रा.ह. मारशेट्टीवार | निरीक्षक | दि.३०.०६.२०३३ |
| ३ | क | श्री.टी.एल. शिंदे | क्षेत्र सहायक | दि.३१.०५.२०२७ |
| ४ | क | श्री. अ.दे. धकाते | वरीष्ठ लिपिक | दि.३१.०३.२०३१ |
| ५ | ड | श्रीमती श.धो. काळे | शिपाई | दि.३१.०७.२०३३ |

२. उपरोक्त अधिसंख्य पदांबाबत वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक असंक-१००१/ प्र.क्र.२९/२००१/ वित्तीय सुधारणा, दि.१०.०९.२००१ मधील कार्यपद्धतीनुसार वित्त विभाग, उप समिती व उच्च स्तर समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

३. सदर अधिसंख्य पदावर कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्यांना संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयानुसार प्रथम ११ महिन्यांकरीता व प्रत्येक वेळी १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुन्हा ११ महिन्यांचा कालावधीकरीता अशाप्रकारे त्यांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवाव्यात. यामध्ये त्यांना पदोन्नती व अनुकंपा धोरणाचा लाभ मिळणार नाही. तसेच त्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी रिक्त होणारे पद भरतीबाबतची आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. उपरोक्त अधिकारी / कर्मचारी हे अधिसंख्य पदावर कार्यरत असेपर्यंत त्यांच्या वेतन व भत्त्यांवर होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेतनासंबंधीच्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

५. सदर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.बीसीसी-२०२०/प्र.क्र.१८७-ए/१६-ब, दि.३०.०६.२०२० नुसार प्राप्त प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्रा शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६१०२६१७४८२९६४०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f8986 04a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E65 62F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.10.26 17:49:16 +05'30'

**( पुजा मानकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे खाजगी सचिव,
३. मा. राज्यमंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे खाजगी सचिव,
४. महालेखापाल - १ / २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ,मुंबईनागपूर/
५. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१६ ब), मंत्रालय, मुंबई
८. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई
१०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राद्वारे)
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२.सर्व संबंधित कर्मचारी (नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई यांच्यामार्फत)
१३. निवडनस्ती, ग्रासं. ३.